**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587


दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २१९ । मंगळवार २६ मे २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

# तोफखाना हद्दीतील पाच जुगार अड्ड्यांवर छापे

## एसपींच्या आदेशानुसार भिंगार कॅम्प पोलिसांची कारवाई



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर शहरातील पाईपलाईन रोड परिसरात पोलिसांनी एकाच वेळी वेगवेगळ्या ठिकाणी पाच जुगार अड्ड्यावर छापे टाकून एकूण १ लाख १४ हजार ३७० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

दि.२५ रोजी पोलीस अधीक्षकांनी भिंगार कॅम्पचे सपोनि जगदीश मुलगीर यांना शहरात काही ठिकाणी जुगार चालू त्यावर कारवाई करा, असा आदेश दिला. त्याप्रमाणे कॅम्प पोलिसांनी दि.२५ रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास तारा पान शॉपच्या मागे, पत्र्याचे आडोशाला भिस्तबाग चौक, पाईपलाईन रोड येथे छापा टाकून जुगार खेळणारे प्रकाश शिवाजी गुंजाळ (रा.गजानन कॉलनी, एमआयडीसी), प्रदीप शिवाजी मंचेवार (रा. वैदूवाडी, भिस्तबाग) यांना २९०० रुपयांच्या मुद्देमालासह ताब्यात घेतले.

गायकवाड चिकन समोर, पाईपलाईन रोड येथे जुगार खेळणारे शशिकांत चंदर शिंदे, नितीन बाबाजी शिंदे व नागेश चंदर शिंदे (सर्व रा. वैदूवाडी) यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून चार हजार रुपयांची रोख रक्कम, तीन मोबाईल, ■ पान ४ वर

### पथकात यांचा सहभाग

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन. अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबमें, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली कॅम्प पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर, सफौ रेवणनाथ दहीफळे, पोलीस अंमलदार रेवणनाथ मिसाळ, विलास गारुडकर, शाहिद शेख, दिलीप शिंदे, धर्मनाथ पालवे, बापू म्हस्के, प्रमोद लहारे यांच्या पथकाने केली.

# केडगाव दुहेरी हत्याकांडानंतर झालेल्या दगडफेकीच्या गुन्ह्यातून सर्व निर्दोष

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगरच्या केडगावमध्ये २०१८ मध्ये दोघा शिवसैनिकांचा खून झाला होता. त्यानंतर झालेल्या दगडफेक आणि रस्ता रोको प्रकरणी शिवसेनेचे दिवंगत माजी आमदार अनिल राठोड यांच्यासह ६०० शिवसैनिकांवर कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या खटल्याचा निकाल आता लागला असून न्यायालयाने सबळ पुराव्याअभावी सर्वांची निर्दोष मुक्तता केली आहे.

एप्रिल २०१८ मध्ये केडगाव येथे शिवसेनेचे उपशहर प्रमुख संजय कोतकर आणि कार्यकर्ते वसंत ठुबे यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. या हत्याकांडानंतर शिवसैनिकांमध्ये तीव्र असंतोष पसरला होता. हत्येच्या घटनेनंतर संतप्त जमावाने केलेली दगडफेक, रस्ता रोको, पोलिसांना शिवीगाळ, सरकारी कामात अडथळा आणणे आणि मृतदेहाची अवहेलना करणे यावरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. सुरुवातीला पोलिसांनी या गुन्ह्यात सर्व आरोपींवर सदोष मनुष्यवधाचा प्रयत्न केल्याप्रकरणी भादंवि कलम ३०८ लावले होते. मात्र, नंतरच्या तपासात



पोलिसांनी हे गंभीर कलम वगळून इतर वाढीव कलमे लावली, त्यामुळे गुन्ह्याचे गांभीर्य काहीसे कमी झाले होते.

या कारवाईनंतर आमदार अनिलभैय्या राठोड यांनी म्हटले होते केडगावमधील दगडफेक शिवसैनिकांनी केली नसून, मारेकऱ्यांनी दहशत निर्माण करण्यासाठी आणि नातेवाईकांच्या आक्रोशातून ती झाली होती. शिवसेनेचा या दगडफेकीशी थेट संबंध नसताना पोलिसांनी खोटे गुन्हे दाखल केल्याचा आरोप त्यांनी केला होता. पुढे २०२० मध्ये करोना साथीच्या लाटेत राठोड यांचे निधन झाले.. न्यायालयात खटला सुरु होता. त्याचा निकाल आता आला असून सर्वांची सुटका झाली आहे.

**अहिल्यानगर केडगाव दुहेरी हत्याकांड नंतर झालेल्या दगडफेक मधील आरोपी** १) दिलीप नानाभाऊ सतपुते २) योगीराज शशिकांत गाडे ३) विट्ठल नानाभाऊ सतपुते ४) विजय मोहनराव पटारे ५) हर्षवर्धन महादेव कोटकर ६) अभिमन्यु राजू जाधव ७) विक्रम अनिल राठौड़ ८) सचिन तुकाराम जाधव ९) संभाजी अशोक कदम १०) भैया राजेश वैजीनाथ सतपुते ११) चंद्रकांत आनंद उजागरे १२) राजेंद्र मोहनराव पटारे १३) पिंटू देवीदास भानुदास मोधवे १४) रमेश रघुनाथ परतानी १५) रावजी बालाजी नांगरे १६) विक्की विक्रम पाठक २९९ १७) संग्राम बबनराव शेल्के १८) विशाल वसंत गायकवाड़ १९) दीपक साहेबराव खैरे २०) ज्ञानेश्वर मछिंद्र दौंडकर नन्नू २१) शुभम संजय बेंद्रे २२) विशाल संजय ■ पान ४ वर

### विखे पाटील ग्रीन सिटी मोहिमेअंतर्गत १ जूनपासून वृक्षारोपणास प्रारंभ

# एक लाख वृक्ष लागवडीचे ध्येय; नगरकरांना वृक्षांचे महत्त्व पटवून देणार - उपमहापौर अ‍ॅड. जाधव

## वृक्षारोपण व संवर्धन समितीची नियोजन बैठक



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पर्यावरणाचा दिवसेंदिवस होत असलेला ऱ्हास आणि त्यामुळे मानवी जीवनावर होणारे विपरीत परिणाम हे गंभीर स्वरूप धारण करत आहेत. विशेषतः मेट्रो शहरांमध्ये वाढते प्रदूषण, धुराचे प्रमाण आणि हवामानातील बदल यामुळे नागरिकांना श्वसनाचे विकार वाढताना दिसत आहेत. हा प्रश्न भविष्यात अहिल्यानगरमध्येही मोठ्या प्रमाणात जाणवू शकतो, त्यामुळे आताच पर्यावरण संतुलनासाठी ठोस पावले उचलणे आवश्यक असल्याचे मत उपमहापौर अ‍ॅड. धनंजय जाधव यांनी व्यक्त केले. नामदार राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी मोहिमेअंतर्गत अहिल्यानगर शहरात व्यापक वृक्षारोपण अभियान राबविण्यात येणार असून १ जूनपासून या मोहिमेला अधिकृत सुरुवात होणार आहे. या अंतर्गत एक लाख वृक्ष लागवडीचे महत्त्वाकांक्षी ध्येय निश्चित करण्यात आले आहे. या उपक्रमाच्या नियोजनासाठी वृक्षारोपण व संवर्धन समितीची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. अहिल्यानगर महानगरपालिका व साई द्वारका सेवा ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात येत असून शहरात पर्यावरण संवर्धनाची मोठी लोकचळवळ उभी करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. या बैठकीला उपमहापौर अ‍ॅड. धनंजय जाधव, कैलास दिघे, प्रा. हर्षल आगळे, प्रताप काळे, इंजिनिअर प्रताप काळे, राजेंद्र पवार, नितीन थोरात, ■ पान ४ वर

# राहुरीत सुगंधी तंबाखू तयार करणाऱ्या ठिकाणांवर छापे

## साडेतीन लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राहुरी पोलीस ठाणे हद्दीत अवैधरित्या मावा व सुंगधी तंबाखू बनविणाऱ्या वेगवेगळया ठिकाणी छापे टाकून पोलिसांनी सुमारे साडेतीन लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. दिनांक २५ रोजी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सपोनि माणिक चौधरी यांना दिलेल्या आदेशानुसार या कारवाया करण्यात आल्या.

संजीवनी वसाहत राहूरी खुर्द येथे अवैधरित्या मावा बनविणारा गणेश मारुती दिवटे (रा. संजीवनी वसाहत राहुरी खुर्द) यास ताब्यात घेवुन त्याच्याकडून मावा तयार करण्याचे साहित्य व मशीन असा ८४ हजार ८८ रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. राहुरीतील मल्हारवाडी रोड, इंगळे इस्टेट, पंढरी मंगल कार्यालयासमोर या ठिकाणी अवैधरित्या मावा बनविणारा संदीप सुरेश तागड (रा. इंगळे इस्टेट, मल्हारवाडी रोड) यास ताब्यात घेऊन मावा तयार करण्याचे साहित्य व मशीन असा एकुण १ लाख ११



हजार १२० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

स्टेशन रोड गावठाण राहुरी येथे संदीप उर्फ पप्पू नामदेव शिरसाठ (वय ४२ वर्षे, रा. स्टेशन रोड, गावठाण, राहुरी), अनिकेत भीमराज ठोंबे (वय २४ वर्षे, रा. स्टेशन रोड, राहुरी) यांना ताब्यात घेऊन मावा तयार करण्याचे साहित्य व मशीन असा एकूण १ लाख ५४ हजार ३०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि माणिक चौधरी, सफौ राकेश खेडकर, पोहेकॉ नरोटे, पोहेकॉ आजिनाथ पालवे, पोहेकॉ शैलेश रोहोकले, पोहेकॉ विशाल थोरात, पोकॉ ज्ञानेश्वर आघाव, पोकॉ दीपक कुंदे, पोकॉ हरदास, पोकॉ नवनाथ दहिफळे यांच्या पथकाने केली.

### या कलमांन्वये गुन्हा दाखल

तिन्ही कारवायांमध्ये एकूण ३ लाख ४९ हजार ५०८ रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून आरोपींविरुध्द राहुरी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १२३,२२३,२७४, २७५ सह अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम सन २००६ व नियमन २०११ चे कलम २६(२) (),२६(२) (),२७ (३)(),३०(२) (),३(१), ५९ प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# श्रीरामपूरमध्ये अवैध वाळू वाहतूक करणारावर कारवाई



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने श्रीरामपूर तालुक्यातील ऐनतपुर येथे वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्यावर कारवाई करून सुमारे सव्वापाच लाखांचा मुद्देमाल जप्त केला.

दिनांक २५ रोजी पथक श्रीरामपुर शहर पोलीस स्टेशन हद्दीमध्ये पेट्रोलिंग करत असतांना पथकास ऐनतपुर गावच्या शिवारात एका विटकरी रंगाचा टेम्पोमध्ये चोरुन वाळूची वाहतूक सुरू असल्याचे दिसले. टेम्पोची तपासणी केली असता त्यात दोन ब्रास वाळू आढळून आली. टेम्पोचालक आकाश नाना निकम (वय-२१ वर्षे रा. आटवाडी, बेलापूर ता. श्रीरामपूर) यास ताब्यात घेण्यात आले असून, या कारवाईत वीस हजार रुपये किमतीची दोन ब्रास वाळू व पाच लाख रुपयांचा टेम्पो असा एकूण पाच लाख वीस हजार रुपये किमतीचा ■ पान ४ वर

# जुगार-दारूविक्रेत्यांवर छाप्यात साडेअकरा लाखांचा मुद्देमाल जप्त

## एलसीबीचे जिल्ह्यात दहा दारूविक्रेते व एका जुगार अड्ड्यावर कारवाई



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे शाखेने विशेष मोहीम राबवून जिल्हयातील १० अवैध दारू विक्रेत्यांवर व एका जुगार अड्ड्यावर कारवाई करुन ११ लाख ७६ हजार ४७० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

एसपींच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने श्रीगोंदा, कोपरगाव तालुका, नेवासा, बेलवंडी (श्रीगोंदा) राहुरी, लोणी (राहाता) पोलीस ठाणे हद्दीतील अवैध दारू विक्रेत्यांची व अवैध जुगार चालणारे ठिकाणाची माहिती काढून ११ ठिकाणी छापे टाकले. कारवाईमध्ये ■ पान ४ वर

# गोवंश हत्या प्रतिबंधासाठी आवश्यक उपाययोजना करा

## बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर सरकारचे नगरसह सात जिल्ह्यांत निर्देश

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर गोवंश हत्या रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे आदेश सरकारने पोलीस प्रशासनाला दिले आहेत. याबाबत विधानसभा सभापती राहुल नार्वेकर यांनी पोलीस महासंचालकांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, महाराष्ट्र राज्यात संपूर्ण गोवंश हत्या बंदीचा कायदा लागू आहे. ‘‘बकरी ईद‘‘ निमित्त मोठ्या प्रमाणावर गोवंश हत्या होण्याची शक्यता असल्याने प्रामुख्याने मालेगाव-नाशिक, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, सातारा, धाराशिव, धुळे, सोलापूर या जिल्ह्यांमध्ये ‘‘बकरी ईद‘‘ निमित्त गोवंश हत्या प्रतिबंध करण्याच्यादृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करण्यात यावी. तसेच, यावेळी गोरक्षकांवर हल्ला होण्याची शक्यता असल्याने त्यादृष्टीने आवश्यक ती पुढील योग्य ती कार्यवाही नियमानुसार करण्यात यावी, असे निर्देश पोलीस महासंचालकांना सरकारच्या वतीने देण्यात आले आहेत.

## दै. आकर्षण निवडक

### रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलवर निवड; बाबासाहेब भोस यांचा घोगरगावात नागरी सत्कार



**अहिल्यानगर - रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलच्या सदस्यपदी निवड झाल्याबद्दल माजी जिल्हा परिषद अध्यक्ष बाबासाहेब भोस यांचा पंचक्रोशीतील ग्रामस्थांच्या वतीने नागरी सत्कार घेण्यात आला होता यामध्ये घोगरगाव हरिपाठ मंडळ आणि श्रीराम भजनी मंडळ यांच्या वतीने सत्कार करण्यात आला यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष देवेंद्र शेटे, विद्यमान सरपंच सुजाता भोसले, सोसायटीचे चेअरमन प्रकाश बोरुडे, उपसरपंच डॉ. दिलीप भोस, जालिंदर उल्हारे, गवाजी राऊत, विश्वास बोरुडे, महेश बोरुडे, उत्तम धामणे, बाळासाहेब शेटे, अर्जुन देवा शेळके, भुजबळ सर, सुधीर तरटे, राजेंद्र तरटे, प्रशांत भोस आदी उपस्थित होते.यावेळी बोलताना जालिंदर उल्हारे म्हणाले की, ''जात, धर्म किंवा पक्ष न पाहता गोरगरिबांसाठी लढणारे आणि सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने कार्य करणारे बाबासाहेब भोस हे लोकनेते आहेत. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत रयत शिक्षण संस्थेसारख्या नामांकित संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलवर त्यांची निवड होणे ही घोगरगावासाठी अभिमानाची बाब आहे.'' यावेळी उपस्थित मान्यवरांनी बाबासाहेब भोस यांना पुढील सामाजिक व शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सत्कारानंतर उपस्थितांनी त्यांच्या कार्याचा गौरव करत भविष्यातही समाजहिताचे कार्य अधिक जोमाने सुरू ठेवावे व शिक्षण, समाजकारण आणि युवकांसाठी प्रेरणादायी नेतृत्व.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाच्या संधी वाढवण्याची अपेक्षा व्यक्त करत रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून समाजोपयोगी कामांना गती मिळेल. तसेचघोगरगावच्या सामाजिक आणि शैक्षणिक विकासात भोस यांचे योगदान महत्त्वाचे असणार असल्याची भावना व्यक्त केली या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समीर शेख यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रशांत भोस यांनी मानले.**

### सैनिक बँकेतील प्रशासकाच्या कार्यपद्धतीवर अन्याय निर्मूलन सेवा समितीचा आक्षेप

**अहिल्यानगर - पारनेर तालुका सैनिक सहकारी बँकचे प्रशासक यांच्या कार्यपद्धतीवर गंभीर आरोप करत त्यांची निष्पक्ष चौकशी करून तात्काळ बदली करण्यात यावी तसेच त्यांना कोणत्याही प्रकारची बढती देऊ नये, अशी मागणी सहकार आयुक्त व जिल्हा उपनिबंधक यांच्याकडे अन्याय निर्मूलन सेवा समितीच्या वतीने निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. यासंदर्भात समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी या प्रकरणी कारवाई न झाल्यास ६ जून रोजी संघटनेच्या वतीने जिल्हा उपनिबंधक कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे.सदर अर्जात बँकेतील विविध नियुक्त्या, मुदतवाढ, बदली प्रक्रिया, आर्थिक व्यवहार आणि प्रशासकीय निर्णयांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. गणेश सुपेकर यांनी मुदत संपल्यानंतरही बँकेच्या लेटरहेडचा वापर करून शासकीय कार्यालयांशी पत्रव्यवहार केल्याचा आरोप अर्जात करण्यात आला आहे. तसेच, त्यांच्याविरोधात तक्रारी दाखल असतानाही त्यांना पुन्हा सेवेत घेतल्याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत.**

सामाजिक कार्याचा गौरव

# विठ्ठलराव पवार यांना 'हिरोज ऑफ अहिल्यानगर २०२६' पुरस्कार



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पुण्यनगरी परिवाराच्या वतीने आयोजित करण्यात आलेला 'हिरोज ऑफ अहिल्यानगर २०२६' पुरस्कार वितरण सोहळा रविवारी सायंकाळी शिर्डी येथील हॉटेल सेंट लॉर्न येथे उत्साहात आणि दिमाखदार वातावरणात संपन्न झाला. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमात श्री साईबाबा संस्थानचा स्वच्छता विभागात काम केलेला साधारण कर्मचारी ते थेट वार्षिक कोट्यवधींची उलाढाल असलेली राज्यात नावलौकिक असलेली श्री साईबाबा एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी, शिर्डीचे चेअरमन इथपर्यंतचा थक्क करणारा प्रवास तसेच धार्मिक सामाजिक कार्याची आवड आणि योगदान लक्षात घेत मा. श्री. विठ्ठलराव पवार यांना त्यांच्या सामाजिक,कामगार व शेतकरी हिताच्या कार्याबद्दल 'हिरोज ऑफ अहिल्यानगर २०२६' हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

राज्याचे अतिरिक्त पोलीस महासंचालक कृष्ण प्रकाश तसेच बीजमाता पद्मश्री सौ. रहिबाई पोपेरे यांच्या हस्ते मा. पवार यांचा गौरव करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, नागरिक आणि साई संस्थानचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात मान्यवरांनी आपल्या मनोगतातून समाजासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन मिळणे गरजेचे असल्याचे सांगितले. संपूर्ण सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# राज्यस्तरीय मराठी प्राविण्य परीक्षेचा पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात

## मराठी राजभाषा संवर्धन प्रतिष्ठानचा उपक्रम । मराठी राजभाषा ही महाराष्ट्राची ज्ञानभाषा होईल – नरेंद्र फिरोदिया



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** मराठी राजभाषा संवर्धन प्रतिष्ठानच्या (अहिल्यानगर) वतीने राज्यस्तरीय मराठी प्राविण्य परीक्षा २०२५-२६ चा पारितोषिक वितरण समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासून मराठी भाषेची गोडी निर्माण व्हावी तसेच त्यांच्या भाषिक उपयोजन कौशल्यांचा विकास व्हावा, या उद्देशाने पाठ्यपुस्तक व व्याकरणावर आधारित ही राज्यस्तरीय परीक्षा आयोजित करण्यात आली होती.

हा सोहळा उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. फिरोदिया म्हणाले की, ''मराठी राजभाषा ही महाराष्ट्राची ज्ञानभाषा होईल. मराठी भाषेने राज्याला समृध्द केले व या भाषेने अनेकांना समृध्द केले. अल्प कालावधीतच मराठी राजभाषा संवर्धन प्रतिष्ठानचे कार्य अत्यंत उल्लेखनीय ठरले असून, महाराष्ट्रात मराठी भाषेचे संवर्धन, प्रचार आणि प्रसार करण्यासाठी संस्थेच्या अध्यक्षा सुलोचना क्षीरसागर व त्यांच्या संपूर्ण टीमने अत्यंत उत्कृष्ट व नियोजनबद्ध केले असल्याचे त्यांनी सांगितले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेबद्दल आत्मीयता व आकर्षण निर्माण होणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये आयोजित या परीक्षेला तब्बल दहा हजारांहून अधिक विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, त्यापैकी सुमारे ७०० गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. गर्दीने खचाखच भरलेल्या माऊली सभागृहाबाबत उल्लेख करताना फिरोदिया यांनी ''पुढील कार्यक्रमासाठी स्टेडियम घ्यावे लागेल'' अशी मिश्किल टिप्पणीही केली.

संजय कळमकर म्हणाले की, मराठी भाषेला नुकताच अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला असून, समृद्ध इतिहास लाभलेली मराठी ही महाराष्ट्राची आद्य व सांस्कृतिक ज्ञानभाषा आहे. ''मातृभाषा हीच खरी ज्ञानभाषा ठरल्यास विद्यार्थ्यांचा सर्वांगीण बौद्धिक विकास अधिक प्रभावीपणे होऊ शकतो,'' मराठी भाषेतून शिकून अनेक व्यक्ती उच्च पदावर आपले कर्तृत्व सिध्द करत असल्याचेही त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमास महापालिका शिक्षण मंडळाचे प्रशासनाधिकारी जुबेर पठाण, संभाजीनगरचे मराठी रसिक भूलतज्ञ डॉ. विजय दळवी, मा. नगरसेवक नितीन शेलार, बालसाहित्यिक नारायण खरात, अंबिशन बायोलॉजी अकॅडमीचे रवींद्रजी काळे, शिक्षक लहू बोराटे, मराठी अध्यापक संघाचे रंगनाथ सुंबे, कवी ज्ञानदेव उंडे, कायझेन अकॅडमीचे महेश डाळिंबकर, शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे, माध्यमिक शिक्षण सोसायटी संचालक महेंद्र हिंगे, सुनील दानवे, सुरज घाटविसावे, मनपा शिक्षण मंडळाचे लेखाधिकारी कैलास गुंजाळ, मुख्याध्यापक सुभाष येवले, केंद्रप्रमुख अरुण पालवे, प्राचार्या संगीता पाठक, मुख्याध्यापिका वर्षा शेलार, प्रसाद शिंदे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहकार्यवाहक अमोल क्षीरसागर यांनी केले, तर सूत्रसंचालन डॉ. अमोल बागुल यांनी केले. कार्यक्रमास शिक्षक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आशा एज्युकेशन फाउंडेशन संचलित जय बजरंग विद्यालयाच्या सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

सहकार महर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेला मागील

# आर्थिक वर्षात १ कोटी २१ लाख रूपयांचा निव्वळ नफा : चेअरमन अभय पितळे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सहकार महर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल नागरी सहकारी पतसंस्थेला सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात १ कोटी २१ लाख रूपयांचा निव्वळ नफा झाला आहे. आर्थिक वर्षात पतसंस्थेच्या ठेवीत सुमारे ११ कोटींनी वाढ होऊन मार्च २०२६ अखेर एकूण ठेवी ९६ कोटी ४ लाख रुपये इतक्या झाल्या आहेत, अशी माहिती पतसंस्थेचे चेअरमन अभय पितळे यांनी दिली.

पतसंस्थेचा मागील आर्थिक वर्षातील कामगिरीचा ताळेबंद जाहीर करताना चेअरमन अभय पितळे यांनी सांगितले की, व्हाईस चेअरमन शैलेश गांधी, सर्व संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी, सभासद, ठेवीदार, कर्जदार, ग्राहक यांच्या सहकार्याने पतसंस्थेने उत्कृष्ट आर्थिक कामगिरीची परंपरा कायम राखली आहे. रौप्य महोत्सवी वर्षात एप्रिल २०२६ मध्ये संस्थेच्या ठेवींनी १०० कोटींचा टप्पा ओलांडला आहे. मागील आर्थिक वर्षात कर्ज वितरण ७३ कोटी २५ लाख रुपये



असून यात सर्वाधिक वाटा सोने तारण कर्जाचा आहे. कमीत कमी व्याजदरात व कमीत कमी वेळेत ग्राहकांना सोने तारण कर्ज दिले जाते. पतसंस्थेचे खेळते भाग भांडवल २ कोटी ६८ लाख रुपये आहे. स्वनिधी ५ कोटी २७ लाख रुपये, एनपीए तरतूद ५ कोटी रुपये, इतर बँकांतील ठेवी २८ कोटी ५९ लाख रुपये आहे तर सीडी रेशो ७३ टक्के इतका आहे. पतसंस्थेने स्थापनेपासून सतत अ ऑडिट वर्ग

मिळवताना सभासदांना कायम १५ टक्के लाभांश देण्याची कामगिरी केली आहे. रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त सभासदांना संस्मरणीय भेट देण्याचे नियोजन सुरू आहे. पतसंस्थेची स्वमालकीची प्रशस्त व दिमाखदार इमारत असून मार्केट यार्ड शाखेचे लवकरच नूतनीकरण करण्यात येणार आहे. सहकार महर्षी सुवालालजी गुंदेचा यांचा शिस्तबद्ध कारभाराचा आदर्श समोर ठेवून सर्व संचालक कामकाज करतात

पतसंस्थेकडून नेहमीच काळानुरूप बदल अंगिकारले जातात. सध्याच्या काळात डिजिटल तंत्रज्ञान महत्वाचे बनले आहे. त्यादृष्टीने पतसंस्थेचे स्वतः चे मोबाईल ॲप तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. यामुळे ग्राहकांना घरबसल्या एनईएफटी, आरटीजीएस सुविधा मिळणार आहेत. पतसंस्थेचे सोने तारण कर्ज, वेअर हाऊस कर्ज, सोने खरेदीसाठी कर्ज योजना, विविध शासकीय कर भरणा, मोबाईल एसएमएस सुविधा, क्युआर कोड, लाईट बिल भरणा अशा विविध सुविधा उपलब्ध आहेत. संस्थेच्या विविध बँकिंग सेवांचा व्यापारी वर्गाला मोठा लाभ होत असतो. पतसंस्थेच्या विविध योजनांचा ग्राहकांनी लाभ घ्यावा असे आवाहन व्हाईस चेअरमन शैलेश गांधी यांनी केले आहे.

# तहसील कार्यालयात महिला शेतकऱ्याचा आत्मदहनाचा प्रयत्न


## महिला पोलिसांच्या प्रसंगावधानाने अनर्थ टळला । सातबाऱ्यावर चुकीची नोंद झाल्याचा आरोप; प्रशासनाविरोधात संताप

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** पैठण तालुक्यातील ढोरकीन येथील एका महिला शेतकऱ्याने तहसील कार्यालय परिसरात आत्मदहनाचा प्रयत्न केल्याने सोमवारी एकच खळबळ उडाली. मात्र महिला पोलिस कर्मचाऱ्यांनी प्रसंगावधान राखत संबंधित महिलेला रोखल्याने मोठा अनर्थ टळला.

मिळालेल्या माहितीनुसार, ढोरकीन येथील शोभा बबन कुडळे (वय ५१) व त्यांचे पती बबन मारुती कुडळे (वय ६५) यांच्या कारकीन शिवारातील गट क्रमांक ३०५ मधील शेतीच्या सातबाऱ्यावर एका परक्या व्यक्तीच्या नावाची चुकीची नोंद करण्यात आल्याचा आरोप आहे. संबंधित फेरफार रद्द करण्यात यावा, या मागणीसाठी त्यांनी यापूर्वी ३० एप्रिल रोजी निवेदन देत आत्मदहनाचा इशारा दिला होता.

मात्र प्रशासनाकडून कोणतीही दखल घेतली जात नसल्याचा आरोप करत सोमवारी सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास ही महिला तहसील कार्यालय परिसरातील पाण्याच्या टाकीवर चढली. यावेळी काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.



घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सपोनि ईश्वर जगदाळे व पैठण पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलिस कर्मचारी एस.एस. रगडे, एन.एच. बिस्टे, के.एस. उगले, ठोकळ यांनी धाडसाने महिलेला खाली उतरवत परिस्थिती नियंत्रणात आणली. या घटनेमुळे तहसील कार्यालय परिसरात काही काळ नागरिकांची गर्दी झाली होती.

# चांगतपुरीच्या जुनेद शेखची एसआरपीएफमध्ये निवड

## पंचायत समिती सदस्या सखुताई झारगड व डॉ. भारत झारगड यांच्याकडून अभिनंदन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** पैठण तालुक्यातील चांगतपुरी येथील जुनेद शेख याची राज्य राखीव पोलीस बल मध्ये निवड झाल्याने गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांच्या या यशाबद्दल पंचायत समिती सदस्या सखुताई झारगड, डॉ. भारत झारगड सर यांनी शुभेच्छा देत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

यावेळी जगदीशभाऊ विर,व मित्र परिवारातील सदस्य उपस्थित होते. जुनेद शेख यांच्या यशामुळे परिसरातील युवकांमध्ये प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# साहित्य म्हणजे समाजाच्या आचार, विचार, संस्कृती, भाव भावनांचा आरसा होय - कथालेखक बाळासाहेब देशमुख

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अखिल भारतीय मराठी साहित्य संशोधन परिषद व भीमथडी मराठी साहित्य प्रतिष्ठान आयोजित पाचवे राज्यस्तरीय भीमथडी मराठी साहित्य संमेलन केडगाव दौंड येथे संपन्न झाले संमेलनाध्यक्षपदी सुप्रसिद्ध साहित्यिक फ.मु.शिंदे हे होते. तर कथाकथन सत्र अध्यक्षपदी अहिल्या नगरचे कथालेखक श्री बाळासाहेब देशमुख हे होते. कथाकथन सत्राच्या अध्यक्षपदावरून बोलताना कथालेखक बाळासाहेब देशमुख म्हणाले साहित्य लेखन म्हणजे समाजाच्या आचार, विचार, संस्कार, भावभावनांचा आरसाच असतो. समाजातील वास्तववादी चित्र रेखाटत, प्रबोधन करत राहणे.हे कसदार साहित्याचे अंग होय. आज सादर झालेल्या कथा.. या महाराष्ट्रातील विविध भागाचे वैशिष्ट्य, भाषेची गोडी, नव्या जुन्या चालीरीतीचा सुरेख संगम ,गोडवा दर्शविणाऱ्या कथा होत्या.

कथाकथन १७ मध्ये विजया पाटील



मुंबई, अशोक खेडकर जालना , गीताश्री नाईक मुंबई, माधव गाडे परभणी, प्रवीण खोलंबे मुरबाड, विद्या शेळके पुणे, इ. मान्यवरच्या कथा सादर झाल्या.

याप्रसंगी कथाकथन अध्यक्ष बाळासाहेब देशमुख यांनी हरवलेला संवाद ही कथा सादर केली. समाज ,कुटुंब, नाते संबंध यातील प्रेमाचा आपुलकीचा संवाद कसा संपत चालला आहे. याचे वास्तवदर्शी चित्रण कथेत होते. महाराष्ट्राच्या विविध भागातून साहित्यिक, संमेलनसाठी हजर होते. कथाकथन कार्यक्रमात सगळेच मंत्रमुग्ध झाले होते..

सदर संमेलन मध्ये मुख्य संयोजक ज्येष्ठ साहित्यिक दशरथ यादव यांच्या शुभहस्ते बाळासाहेब देशमुख यांना सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कवी संदीप रासकर यांनी केले कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन पत्रकार दीपक पवार यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी ज्येष्ठ साहित्यिक संजय सोनवणे व सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक – तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### एआयएफ अंतर्गत कृषी ड्रोनसाठी जिल्हा सहकारी बँकांमार्फत कर्जयोजना सुरु करा




अहिल्यानगर - जिल्हा बँकांमार्फत अ‍ॅग्रीकल्चर इन्फ्रास्ट्रक्चर फंड (एआयएफ) अंतर्गत कृषी ड्रोनसाठी विशेष कर्जयोजना सुरू करण्यात यावी, अशी मागणी प्रभाकरम फाउंडेशनच्या वतीने करण्यात आली. या मागणीचे निवेदन फाऊंडेशनचे अध्यक्ष विपुल तापकीर व निखिल कवडे यांनी कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांना निवेदन दिले. यावेळी कृषीमंत्री भरणे यांनी या मागणीबाबत सकारात्मक भूमिका दर्शविली. कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यासाठी तसेच शेतकऱ्यांना कमी खर्चात आणि अधिक कार्यक्षम पद्धतीने फवारणी सेवा उपलब्ध व्हावी, यासाठी कृषी ड्रोनची गरज दिवसेंदिवस वाढत आहे. विशेषतः युवक आणि ग्रामीण उद्योजकांना कृषी ड्रोन व्यवसायासाठी प्रोत्साहन मिळावे, यासाठी सुलभ कर्जपुरवठा आवश्यक असल्याचे मत फाऊंडेशनच्या वतीने व्यक्त करण्यात आले. कृषी ड्रोन क्षेत्राला चालना मिळाल्यास शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार होऊन उत्पादनक्षमता वाढण्यास मदत होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

### नगरमध्ये ब्रायडल मेकअप स्पर्धा



अहिल्यानगर- येथील प्रतिबिंब संस्थेच्या वतीने व अहिल्यानगर जिल्हा ब्युटीपार्लर असोसिएशनच्या सहकार्याने दि १० जून रोजी नगरमध्ये ब्रायडल मेकअप स्पर्धा(नववधू मेकअप स्पर्धा)ब्युटिशियन साठी घेण्यात येणार आहे,स्पर्धाचे हे ४ थे वर्षे आहे स्टेशनरोड येथील यश ग्रँड हॉटेल येथे १० जून ला दुपारी १२ वा आयोजित करण्यात आली आहे विजेत्या ब्युटिशियनला बेस्ट ब्युटिशन ऑफ ब्रायडल हा पुरस्कार देण्यात येणार आहे यामध्ये एकूण ३ क्रमांक काढण्यात येणार आहेत. स्पर्धकांनी कोणत्याही प्रकारची,जातीची,धर्माची नववधु बनवता येईल त्यासाठी मेकअपला १ तासाचा वेळ देण्यात येईल,कोणीही या स्पर्धेत भाग घेऊ शकते,ब्युटिशन आपल्याबरोबर एक असिस्टंट ठेवू शकते.सहभागी ब्युटिशनला सहभागाचे प्रमाणपत्र देण्यात येईल ज्यांना या स्पर्धेत भाग घ्यायचा आहे त्यांनी प्रतिबिंब संस्था,स्टेट बँके समोर ,दिल्लीगेट,अहिल्यानगर मोबाईल ९२८४९३०६७४ किंवा अनुजा कांबळे ९८५०२६२५९५, सायली मेहता ८०८७२२६२४६ वर संपर्क साधावा असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

### सुरेश कोठारी यांचे अल्प आजाराने निधन



अहिल्यानगर- महावीरनगर, सावेडी येथील रहिवासी सुरेश देवीचंद कोठारी (वय ७१) यांचे २३ मे रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर २४ मे रोजी नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, जावई, नातवंडे, २ भाऊ, भावजया, १ बहीण असा परिवार आहे.अ‍ॅड. प्रकाश कोठारी,हिंद सेवा मंडळाचे संचालक तथा भाई सथ्था नाईट हायस्कूलचे चेअरमन डॉ.पारस कोठारी यांचे ते बंधू होत.चितळे रोड येथील प्रसिद्ध श्रीकृष्ण किराणा दुकान चे संचालक स्व. डी.आर.कोठारी उर्फ मामाजी हे त्यांचे वडील होते.

---

डिझेल टंचाईमुळे शेतकरी संकटात

## पुरवठा सुरळीत करण्यासाठी भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** जिल्ह्यात निर्माण झालेल्या डिझेल टंचाईमुळे शेतकऱ्यांची शेती मशागतीची कामे ठप्प होत असल्याने शेतकऱ्यांना तात्काळ पुरेशा प्रमाणात डिझेल उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी भूमिपुत्र शेतकरी संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी तसेच गृह व पुरवठा शाखेकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी संघटनेचे अध्यक्ष संतोष वाडेकर यांच्यासह राज्य संपर्कप्रमुख अशोक आंधळे, जिल्हा संघटक संतोष वाबळे, जिल्हा संपर्कप्रमुख अरुण बेलकर, जिल्हाप्रमुख सुभाष करंजुले, तालुका सचिव अन्सार पटेल, तालुका उपाध्यक्ष बाळासाहेब वाळुंज, राजेंद्र कर्डिले आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, सध्या जिल्ह्यात डिझेलचा मोठ्या प्रमाणात तुटवडा निर्माण झाला असून त्याचा थेट परिणाम शेतीच्या कामांवर होत आहे. ट्रॅक्टर, पंप, शेती अवजारे व इतर यंत्रसामग्रीसाठी डिझेल अत्यावश्यक असताना अनेक पेट्रोल पंपांवर डिझेलचा साठा उपलब्ध नसल्याची परिस्थिती आहे. काही ठिकाणी मर्यादित प्रमाणात डिझेल दिले जात असून कॅनमध्ये डिझेल देण्यासही नकार दिला जात आहे.

याशिवाय ट्रॅक्टरसाठी डिझेल घेताना सातबारा उतारा किंवा ट्रॅक्टरचे आरसी बुक मागितले जात असल्याने शेतकऱ्यांना अधिक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे नांगरणी, पेरणी, फवारणी, मशागत यांसारखी महत्त्वाची शेतीकामे वेळेत होत नसून शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान वाढत असल्याचे संघटनेने नमूद केले आहे.

आधीच नैसर्गिक संकटे, अवकाळी पाऊस आणि वाढते उत्पादन खर्च यामुळे शेतकरी अडचणीत असताना डिझेल टंचाईमुळे परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे. त्यामुळे जिल्ह्यासह राज्यातील सर्व पेट्रोल पंपांवर शेतकऱ्यांना आवश्यक त्या प्रमाणात डिझेल उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने तातडीने सूचना द्याव्यात, कॅनमध्ये डिझेल देण्याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा तसेच डिझेल देताना सातबारा किंवा आरसी बुकची सक्ती करू नये, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

दरम्यान, शेतकऱ्यांना डिझेलचा पुरवठा सुरळीत न झाल्यास भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे अध्यक्ष संतोष वाडेकर यांच्या नेतृत्वाखाली तीव्र स्वरूपाचे आंदोलन उभारण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

---

# एसा बेस्ट स्ट्रक्चर अवॉर्ड सोहळा दिमाखात; दर्जेदार बांधकामांनाचा गौरव

### अहिल्यानगरात एसा बेस्ट स्ट्रक्चर अवॉर्ड उत्साहात

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** आर्किटेक्ट इंजिनीअर्स अँड सर्व्हेअर्स असोसिएशन (एसा) अहिल्यानगरच्या वतीने आयोजित करण्यात आलेला 'बेस्ट स्ट्रक्चर अवॉर्ड' सोहळा नुकताच मोठ्या उत्साहात आणि दिमाखात पार पडला. या स्पर्धेमध्ये रहिवासी, व्यावसायिक, औद्योगिक, सामाजिक, ओपन तसेच अहिल्यानगर शहराबाहेरील स्ट्रक्चर अशा एकूण दहा विभागांमध्ये स्पर्धा घेण्यात आली होती. यासाठी तब्बल ७३ सभासद संस्थांनी सहभाग नोंदवला.

स्पर्धेचे परीक्षण करण्यासाठी पुणे एसा अध्यक्ष इंजि. महेश बांगड, बिल्डर असोचे माजी सचिव मनोज देशमुख, पुणे एसाचे खजिनदार जयंत पटवर्धन तसेच पुणे बिल्डर असोच्या ई.सी. सदस्य व आरसीसी कन्सल्टंट इंजि. आरती भट यांना निमंत्रित करण्यात आले होते. परीक्षकांनी सर्व एंट्रीजची छाननी करून निकषांनुसार गुणांकन केले तसेच आवश्यक प्रकल्पांना भेटी देऊन प्रत्यक्ष पाहणीही केली.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी तथा 'नगररचना व मूल्यनिर्धारण विभाग' पुणेचे संचालक जितेंद्र भोपळे यांनी एसाच्या या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की, अशा निष्पक्ष स्पर्धांमुळे सभासदांना इतरांच्या उत्कृष्ट कामांचे अनुकरण करून दर्जेदार स्ट्रक्चर उभारण्यास प्रोत्साहन मिळते. शहराचे बाह्य सौंदर्य वाढविण्यासोबतच गुणवत्तापूर्ण




बांधकामांसाठीही या स्पर्धा महत्त्वपूर्ण ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले. आर्किटेक्ट, इंजिनीअर्स, आरसीसी डिझायनर आणि विकासक यांच्यातील समन्वय व सांघिक भावना जोपासणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी प्रमुख उपस्थिती नोंदवणारे अहिल्यानगरचे आमदार संग्राम जगताप यांनी विजेते आणि सहभागी सभासदांचे अभिनंदन केले. शहर विकासात संस्थेच्या सभासदांचे मोलाचे योगदान असल्याचे सांगत बांधकाम मंजुरीचे शासकीय नियम नागरिकांसाठी सुसह्य व्हावेत, अशी अपेक्षा त्यांनी प्रशासनाकडे व्यक्त केली. शहरात आता वीस मजली इमारती उभ्या राहत असून त्यामध्ये इंजिनीअर्स, आर्किटेक्ट आणि बांधकाम व्यावसायिकांची महत्त्वाची भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले. एसा असोसिएशन वर्षभर तांत्रिक कार्यशाळांचे आयोजन करत असून त्यातून दर्जेदार इंजिनीअर्स आणि आर्किटेक्ट घडत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

या सोहळ्याचे प्रायोजक पोलाद स्टील, जालनाचे सेल्स अँड मार्केटिंग प्रेसिडेंट जयेश मेहता यांनी मागील जवळपास वीस वर्षांपासून पोलाद स्टील या उपक्रमास सहकार्य करत असल्याचे सांगितले. सामाजिक उपक्रमात सहभागी होण्याचा आनंद असल्याचे त्यांनी व्यक्त केले. पोलाद स्टीलच्या गुणवत्तेप्रमाणेच एसा आपल्या सभासदांचा व्यावसायिक दर्जा उंचावत असल्याचे त्यांनी नमूद केले. या कार्यक्रमासाठी पोलाद स्टीलचे व्हाईस प्रेसिडेंट आशिष भाबडा हेही उपस्थित होते. कार्यक्रमाच्या आयोजनात सचिव भूषण पांडव, समन्वयक आदिनाथ दहिफळे व संजय चांडवले, उपाध्यक्ष प्रदीप तांदळे, खजिनदार सुनील औटी, संतोष खांडेकर, जितेश सचदेव, सचिन डागा, संकेत पादिर, अनमोल जैन, गौरव मांडगे तसेच लेडीज विंग अध्यक्ष वैशाखी हिरे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

---

## कर्जुले हर्या गावच्या जावयाची पीएसआयपदी निवड; ग्रामस्थांकडून सत्कार

### सचिन वाकचौरे यांच्या यशाने गावाची मान उंचावली – माजी सरपंच रामदास दाते



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** पारनेर तालुक्यातील कर्जुले हर्या येथील शेलार परिवाराचे जावई तथा बारदरे (ता. जि. अहिल्यानगर) येथील सचिनराव बबन वाकचौरे यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षेत उत्तम यश संपादन करून पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय) पदाला गवसणी घातली. त्यांच्या या यशाबद्दल कर्जुले हर्या ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

सचिन वाकचौरे यांचे वडील अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. अशा कठीण परिस्थितीतही त्यांनी मुलांना शिक्षणासह चांगले संस्कार दिले. सचिन यांचे प्राथमिक शिक्षण बारदरे येथील जिल्हा परिषद शाळेत चौथीपर्यंत झाले. त्यानंतर त्यांनी पुढील शिक्षण अहिल्यानगर येथे बारावीपर्यंत पूर्ण केले.

कुटुंबाची आर्थिक परिस्थिती सुधारावी या उद्देशाने बारावीनंतर त्यांनी पोलीस भरतीत सहभाग घेतला आणि त्यांची निवड झाली. सध्या ते मुंबई पोलीस दलात कार्यरत आहेत. मात्र, मोठे अधिकारी होण्याचे स्वप्न त्यांनी कायम जिवंत ठेवले. जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रम यांच्या जोरावर त्यांनी एमपीएससी परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवत पोलीस उपनिरीक्षक पद मिळविले.

सचिन वाकचौरे हे कर्जुले हर्या येथील सामाजिक कार्यकर्ते बबनराव शेलार यांचे बंधू बाळासाहेब शेलार यांचे जावई असल्याने ग्रामस्थांनी त्यांचा अभिमानाने सत्कार केला. यावेळी बोलताना गावचे माजी सरपंच रामदास दाते म्हणाले, ''सचिन वाकचौरे यांनी आपल्या कर्तृत्वाने समाजासह आई-वडिलांची मान अभिमानाने उंचावली आहे. जावई म्हणून त्यांनी आमच्यासमोर एक आदर्श निर्माण केला असून, त्यांच्या यशाचा आम्हा ग्रामस्थांना अभिमान आहे.''

यावेळी तंटामुक्ती समितीचे माजी अध्यक्ष गंगारामशेठ उंडे यांनी सचिन वाकचौरे यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच अखिल मातंग समाज चळवळीचे विश्वस्त गणेश आल्हाट व गोरख माने यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमास ज्येष्ठ मार्गदर्शक विष्णू आंधळे गुरुजी, शशिकांत आंधळे, झुंबर गावडे, दत्तू वाघ, दत्तात्रय शेलार, संजय शेलार, बंटी शेलार, आकाश शेलार, विजय शिंदे, साळवे, सुनील माळी, आकाश गायकवाड, संतोष वाघ, सचिन शेलार, आनंद पवार, रोहन साळवे, अनिता वाघ, सरूबाई वाघ, सुमन वाघ, लक्ष्मीबाई शेलार, सावित्रीबाई शेलार, गीताबाई शिंदे, सिताबाई साळवे आदी मान्यवर उपस्थित होते.

---

## डॉक्टर मृदुल सीमा राहुल मुनोत एमबीबीएस गोल्ड मेडलिस्ट परीक्षेत उत्तीर्ण

### बडोदा येथील नामांकित वैद्यकीय महाविद्यालयात घवघवीत यश; अहिल्यानगरच्या शैक्षणिक परंपरेत मानाचा तुरा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अहिल्यानगरच्या शैक्षणिक परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवणारी उल्लेखनीय कामगिरी डॉक्टर मृदुल सीमा राहुल मुनोत यांनी केली आहे. भारतातील नामांकित सुमनदीप विद्यापीठ अंतर्गत असलेल्या एस.बी.के.एस. मेडिकल कॉलेज अँड रिसर्च सेंटर येथे एमबीबीएस फायनल परीक्षेत गोल्ड मेडल मिळवत त्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशामुळे अहिल्यानगरच्या शैक्षणिक क्षेत्रात अभिमानाची भावना व्यक्त होत आहे.

डॉ. मृदुल मुनोत यांचे पहिली ते दहावीपर्यंतचे शिक्षण सेंट मायकल स्कूल येथे झाले असून ते कायमच प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होत आले आहेत. त्यानंतर अकरावी-बारावीचे शिक्षण रामकृष्ण विद्यालय येथे पूर्ण केले.



शिक्षणासोबतच क्रीडा क्षेत्रातही त्यांनी विशेष कामगिरी केली आहे. बास्केटबॉल या खेळामध्ये राज्यस्तरीय स्तरावर उल्लेखनीय यश मिळवत त्यांनी आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. अभ्यास आणि क्रीडा यांचा उत्कृष्ट समतोल राखत त्यांनी वैद्यकीय शिक्षणात मिळवलेले यश अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

विशेष म्हणजे त्यांची आई सीमा राहुल मुनोत या देखील एमबीबीएस गोल्ड मेडलिस्ट असून वैद्यकीय क्षेत्रातील ही यशस्वी परंपरा पुढे चालवत डॉ. मृदुल मुनोत यांनी कुटुंबाचा गौरव वाढविला आहे.

या यशाबद्दल आमदार संग्राम जगताप, माजी उपमहापौर गणेश भोसले, माजी उपसभापती मीनाताई संजय चोपडा, नगरसेवक प्रकाश भागानगरे, इम्रतभाई मुनोत, गौतम मनोज, मदन गांधी, अण्णासेठ मुनोत वसंत फिरोदिया अजित गांधी राजूभाऊ गांधी अनिल दुगड विजय गुदेचा प्रकाश गांधी राजेश चेंगेडिया नितीन शिंगवीआदींनी त्यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

---

## नागापूर जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक चाँद शेख यांना 'शिक्षण गौरव' पुरस्कार प्रदान

### भीमथडी मराठी साहित्य संमेलनात महादेव जानकर व फ. मु. शिंदे यांच्या हस्ते गौरव




दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** शैक्षणिक क्षेत्रासोबतच सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे नागापूर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक चाँद हुसेन शेख यांना राज्यस्तरीय भीमथडी मराठी साहित्य संमेलनात ''शिक्षण गौरव पुरस्कार'' प्रदान करून सन्मानित करण्यात आले. त्यांच्या शिक्षणसेवा, सामाजिक बांधिलकी आणि सांस्कृतिक कार्याची दखल घेत हा पुरस्कार देण्यात आला.

भीमथडी मराठी साहित्य प्रतिष्ठानच्या वतीने चौफुला केडगाव (ता. दौंड, जि. पुणे) येथे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय साहित्य संमेलनात हा पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात पार पडला. राष्ट्रीय समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष महादेव जानकर आणि ज्येष्ठ साहित्यिक फ. मु. शिंदे यांच्या हस्ते चाँद शेख यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी संमेलनाचे उद्घाटक आमदार राहुल कुल, संमेलनाचे मुख्य संयोजक दशरथ यादव, प्रमुख पाहुणे पै. नाना डोंगरे, संजय सोनवणे, दिपक पवार यांच्यासह राज्यभरातील साहित्यिक, कवी, लेखक आणि सामाजिक कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

मुख्याध्यापक चाँद हुसेन शेख यांनी शिक्षक म्हणून कार्यरत असताना अनेक विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देऊन त्यांना उज्ज्वल भविष्याची दिशा दिली आहे. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करण्यासाठी त्यांनी विविध शैक्षणिक उपक्रम राबविले. शाळा ही केवळ शिक्षण देणारी संस्था नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे केंद्र असावे, या विचारातून त्यांनी सातत्याने काम केले आहे.

शैक्षणिक क्षेत्राबरोबरच सामाजिक कार्यातही त्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला आहे. ग्रामस्थांच्या सहकार्याने शाळांच्या पायाभूत सुविधा उभारण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांनी ज्या-ज्या गावांमध्ये शिक्षक म्हणून सेवा बजावली, त्या ठिकाणी लोकसहभागातून शाळा विकासाची चळवळ उभी केली. किन्ही (पारनेर), दरेवाडी (नगर), हिवरेझरे (नगर), कनोली (संगमनेर), नाचनगाव (अकोले) आणि नवनागापूर (नगर) येथील शाळांच्या इमारती उभारण्यात त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधा मिळाव्यात यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला.

विशेष म्हणजे चाँद शेख हे उत्कृष्ट पोवाडा गायक म्हणूनही परिचित आहेत. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज तसेच विविध महापुरुषांच्या कार्यावर आधारित पोवाडे सादर करून ते इतिहास आणि संस्कृती जतनाचे कार्य करत आहेत. त्यांच्या प्रभावी गायनातून युवकांमध्ये इतिहासाबद्दल अभिमान आणि प्रेरणा जागृतीचे कार्य ते करत आहे. त्यांच्या या बहुआयामी कार्याची दखल घेत राज्यस्तरीय भीमथडी मराठी साहित्य संमेलनात ''शिक्षण गौरव पुरस्कार'' देऊन सन्मान करण्यात आला. पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

---

## धरमपुरी निंबळक येथे भिशी ग्रुप व मित्रमंडळ अधिकमास निमित्त महाप्रसादाचे वाटप



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** निंबळक येथील धरमपूरी तीर्थक्षेत्र या ठिकाणी श्री गजानन महाराज यांच्या मूर्तीस महा अभिषेक करण्यात आला.तसेच प्रभू श्रीराम,लक्ष्मण व सीता यांच्या मूर्तीस महा अभिषेक करून दुपारी बारा वाजता महाआरती करण्यात आली महाआरतीनंतर भिशी ग्रुप व मित्रमंडळाचे वतीने अधिकमास निमित्त महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.धोंडा च्या पवित्र महिन्यानिमित्त या महाप्रसाद (भंडारा)च्या आयोजन करण्यात आले होते.याप्रसंगी इंजि. चंद्रकांत पुंड,इंजि. ज्ञानदेव शिरसाठ,कॅप्टन सुधिर पुंड,इंजि. पोपट शिंदे,इंजि.नवनाथ खेडकर,प्रा.दिलीप ठुबे,इंजि.बापू फुंदे,प्रा.मच्छिंद्र म्हस्के,इंजि. राधाकिसन घुले,विनायक साने,विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अमोल भांबरकर,मंदिर,अर्चक,पुरोहित आयमाचे जिल्हाप्रमुख श्रीकांत नांदापूरकर,गायत्री परिवाराचे प्रमुख काशिनाथ मोडे,विनोद पुंड,अनिल इवळे,भास्कर चौधरी,गणेश कोल्हे,सुधाकर कानडे आदी उपस्थित होते.

चंद्रकांत पुंड म्हणाले,हिंदू धर्मात अधिक मास हा महिना पवित्र समजला जातो.अन्नदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे.धरमपुरी हे तीर्थक्षेत्र अन्नदानाच्या धार्मिक कार्यात अग्रेसर आहे.

### शिवसैनिकांना जाणीवपूर्वक अडकविण्याचा कट?

# युवा सेनेचे जिल्हाप्रमुख योगेश गलांडे यांच्यावर खोटे गुन्हे दाखल करण्याचा प्रयत्न

## शिवसेनेच्या शिष्टमंडळाचे जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** युवा सेनेचे जिल्हाप्रमुख योगेश गलांडे यांचे नाव वापरून खोटा बनाव रचत गुन्ह्यात अडकविण्याचा प्रयत्न होत असल्याचा गंभीर आरोप शिवसेनेच्या वतीने करण्यात आला आहे. शहरात शिवसैनिकांना जाणीवपूर्वक लक्ष्य करून त्यांच्यावर दबाव आणण्याचे प्रकार वाढत असल्याचा आरोप करत शिवसेनेच्या शिष्टमंडळाने मंगळवारी (दि. २६ मे) जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका यांची भेट घेत निवेदन दिले.

यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका यांनी संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून वस्तुस्थिती तपासली जाईल तसेच विनाकारण कोणालाही त्रास दिला जाणार नाही, असे आश्वासन दिले. यावेळी शिवसेनेचे शहरप्रमुख संभाजी कदम, जिल्हाप्रमुख बाबुशेठ टायरवाले, दिलीप सातपुते, विक्रम राठोड, नगरसेवक दत्तात्रय कावरे, अभिषेक भोसले आदी उपस्थित होते.

योगेश चंद्रकांत गलांडे हे सावेडी गाव येथील संघर्ष चौक परिसरात वास्तव्यास असून नवनागापूर येथे त्यांचे कार्यालय आहे. ते स्वराज्य कामगार संघटनेचे सचिव तसेच युवा सेनेचे जिल्हाध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. कामगारांच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवून कंपन्या व कामगार यांच्यात समन्वय साधण्याचे काम ते करत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

गलांडे यांनी दिलेल्या निवेदनानुसार, एमआयडीसी परिसरात कंत्राटदार म्हणून काम करणारा चिरंजीव दत्तात्रय गाढवे हा विविध कंपन्यांतील अधिकारी व सुपरवायझर यांना धमकावून त्रास देत असून, त्याच्यावर खंडणी व धमकावण्याचे गुन्हे दाखल आहेत. दि. २७ डिसेंबर २०२५ रोजी सनफार्मा चौकात गाढवे याने गाडी आडवी घालत रिव्हॉल्व्हरचा धाक दाखवून कोयत्याने हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप गलांडे यांनी केला असून त्याबाबत एमआयडीसी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा क्रमांक ९५८/२०२५ दाखल करण्यात आल्याचे त्यांनी म्हटले आहे.

त्यानंतर गाढवे याने न्यायालयीन प्रक्रियेदरम्यान दबाव टाकण्याचा प्रयत्न केल्याचाही आरोप करण्यात आला आहे. जामिनाला विरोध करू नये यासाठी धमक्या देण्यात आल्याने एनसी क्रमांक ११२/२०२६ दाखल करण्यात आल्याचे निवेदनात नमूद आहे. तसेच न्यायालयाने जामीन मंजूर केल्यानंतर त्याने अटींचे पालन न केल्यामुळे त्याच्याविरोधात जामीन रद्द करण्यासाठी अर्ज दाखल करण्यात आला होता.

याच पार्श्वभूमीवर स्वतःवरील गुन्हे मागे घेण्यासाठी गाढवे हा सातत्याने खोट्या घटना सांगून गुन्हे दाखल करण्याचा प्रयत्न करीत असल्याचा आरोप गलांडे यांनी केला आहे. एमआयडीसी पोलीस स्टेशनमध्ये कथित घटनांबाबत कोणतीही सत्यता आढळून न आल्याने कारवाई झाली नसल्याचेही त्यांनी नमूद केले.

### १२ वर्षांखालील क्रिकेट लीगला उत्साहात सुरुवात

# एसके अकॅडमीचा साईदीप हिरोजवर ६ धावांनी विजय



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर येथील वाकोडी परिसरातील साईदीप क्रिकेट अकॅडमीच्या मैदानावर १२ वर्षांखालील मुलांच्या टी-२० क्रिकेट लीग स्पर्धेला आज उत्साहपूर्ण वातावरणात प्रारंभ झाला. लहान वयातील खेळाडूंमध्ये क्रिकेटबाबत असलेली आवड, जिद्द आणि स्पर्धात्मक भावना यावेळी पाहायला मिळाली.

स्पर्धेचे उद्घाटन उद्योजक श्री. संदीप पडोळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपस्थित खेळाडूंना मार्गदर्शन करताना त्यांनी सातत्यपूर्ण सराव, शिस्त आणि खेळातील समर्पण यामुळेच यश मिळते, असे सांगत सर्व खेळाडूंना उत्कृष्ट खेळासाठी शुभेच्छा दिल्या.

या क्रिकेट लीगचे आयोजन तेजस करमरकर व परेश रासकर यांनी केले असून, साईदीप क्रिकेट अकॅडमीचे संचालक संदीप घोडके यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. ग्रामीण व शहरी भागातील होतकरू खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.

स्पर्धेत एकूण पाच संघांनी सहभाग नोंदविला असून, पहिल्याच दिवसापासून खेळाडूंसह पालक आणि क्रिकेटप्रेमींची मोठी उपस्थिती पाहायला मिळाली. लहान मुलांच्या खेळातील आत्मविश्वास, चपळता आणि जिंकण्याची जिद्द यामुळे सामने अधिक रंगतदार होत असल्याचे चित्र मैदानावर दिसून आले.

उद्घाटनाचा सामना एसके अकॅडमी आणि साईदीप हिरोज यांच्यात खेळविण्यात आला. प्रथम फलंदाजी करताना एसके अकॅडमी संघाने निर्धारित षटकांत ९ बाद ११९ धावांची मजल मारली. संघातील फलंदाजांनी संयमी खेळी करत संघाला आव्हानात्मक धावसंख्या उभारून दिली.

प्रत्युत्तरात साईदीप हिरोज संघाने विजयासाठी जोरदार प्रयत्न केले. मात्र एसके अकॅडमीच्या गोलंदाजांनी अचूक मारा करत प्रतिस्पर्धी संघाला ५ बाद ११३ धावांवर रोखले. त्यामुळे एसके अकॅडमी संघाने ६ धावांनी रोमांचक विजय संपादन केला. सामन्यात उत्कृष्ट अष्टपैलू कामगिरी करणाऱ्या एसके अकॅडमीच्या साई धाकतोडे याला 'सामनावीर' पुरस्काराने गौरविण्यात आले. त्याच्या खेळीचे उपस्थितांकडून विशेष कौतुक करण्यात आले.

स्पर्धेच्या आगामी सामन्यांमध्ये आणखी चुरशीच्या लढती पाहायला मिळतील, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला असून, या लीगमधून भविष्यातील गुणवंत क्रिकेटपटू घडतील, अशी अपेक्षाही व्यक्त होत आहे.

# न्यू आर्ट्स महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांचे स्पर्धा परीक्षेत घवघवीत यश



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे न्यू आर्टस, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये विविध देशपातळीवर आणि राज्य पातळीवर घेतल्या जाणा-या स्पर्धा परीक्षांमधून घवघवीत यश संपादन केले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष मा. रामचंद्रजी दरे साहेब, उपाध्यक्ष मा. डॉ. विवेकजी भापकर साहेब, सचिव अ‍ॅड. मा. विश्वासरावजी आठरे पाटील साहेब, सहसचिव इंजि. मुकेशजी मुळे साहेब, प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी अभिनंदन केले.

रसायनशास्त्र विभागातील महेश ढेपे आणि वैभव मंचरे हे देशातील नामांकित शिक्षण संस्था असलेलेली इंडियन इन्सिटिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी () च्या वतीने घेण्यात येणारी – परीक्षा उत्तिर्ण झाले असून त्यांनी देशपातळीवर अनुक्रमे ८८३ व १३८७ क्रमांक प्राप्त केला आहे. तर वैभव पवार याने – ही परीक्षा शिष्युवृत्तीसह उत्तिर्ण झाला असून त्याने देशपातळीवर २४ वा क्रंमाक मिळवत मध्य प्रदेश भोपाळ येथली  येथे पीएचडी करिता प्रवेश मिळविला आहे. विभागातील अनेक विदयार्थी नेट आणि सेट परीक्षा उत्तिर्ण झाले आहेत. यामध्ये शिवानंद चव्हाण आणि भावना राजपुरोहित हे दोघे – परीक्षा देशपातळीवर अनुक्रमे ३८ व ५५ क्रंमाक मिळवत उत्तिर्ण झाले आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विदयापीठ, पुणे यांच्यावतीने घेण्यात येणारी परीक्षेत शिवानंद चव्हाण, भावना राजपुरोहित, कु. मोनिका रणसिंग, कु. पुजा पालवे, कु. ज्ञानेश्वरी जवाणजळे, शिवम मरकड, गणेश पंधरकर, कु. प्रेरणा यादव, आनंद मुथा या विदयार्थ्यांनी उत्तिर्ण होत मोठे यश संपादन केले.

रसायनशास्त्र विभागातील विदयार्थीनी कु. दिव्या भडके हीने महाराष्ट्र लोकसेवा आयोग () परीक्षा उत्तिर्ण होत उल्लेखनिय यश प्राप्त केले तर कु. प्रज्ञा जोशी हीने जिल्हा न्यायालयाच्या वतीने घेण्यात येणा-या विविध पदांसाठी झालेल्या परीक्षेत यश मिळविले.

रसायनशास्त्र विभागाच्यावतीने विद्यार्थ्यांकरिता , आणि – मार्गदर्शन कार्याशाळा दरवर्षी आयोजित करण्यात येतात. याचा फायदा अनेक विद्यार्थ्यांना झाला असून महाविदयालयाचे व रसायनशास्त्र विभागाचे अनेक विदयार्थी स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातुन उच्च पदांवर कार्यरत असल्याचे प्रतिपादन रसायनशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख प्रा. श्रीमती. सुषमा दरे यांनी केले.

### प्रभाग क्रमांक ११ मध्ये रस्ता कॉंक्रिटीकरणाचा शुभारंभ

# नागरिकांच्या विश्वासातूनच विकासकामांना गती - नगरसेविका सुनीता गेनप्पा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** प्रभाग क्रमांक ११ मधील आनंदी बाजार परिसरात नागरिकांच्या अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या देवीघर ते अष्टेकर घर या रस्ता कॉंक्रिटीकरण कामाचा शुभारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. नगरसेविका सुनीता संतोष गेनप्पा यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या विकासकामास प्रत्यक्ष सुरुवात झाल्याने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

आनंदी बाजार परिसरातील हा अंतर्गत रस्ता मागील काही वर्षांपासून खराब अवस्थेत होता. पावसाळ्यात चिखल, खड्डे आणि साचणारे पाणी यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. विशेषतः शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना ये-जा करताना अडचणी निर्माण होत असल्याने या रस्त्याच्या कॉंक्रिटीकरणाची मागणी सातत्याने होत होती. अखेर नगरसेविका सुनीता गेनप्पा यांच्या प्रयत्नातून या रस्त्याचे काम मंजूर होऊन शुभारंभ करण्यात आला.

यावेळी नगरसेविका सुनीता संतोष गेनप्पा यांनी आपल्या भाषणात सांगितले की, ''प्रभागातील प्रत्येक नागरिकाला चांगल्या सुविधा मिळाव्यात, हीच आमची भूमिका आहे. नागरिकांनी दिलेल्या सूचनांनुसार विकासकामांना प्राधान्य दिले जात आहे. आनंदी बाजार परिसरातील रस्त्याची समस्या अनेक वर्षांपासून होती. नागरिकांचा विश्वास आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा यामुळे हे काम प्रत्यक्षात आले आहे.''

पुढे बोलताना त्या म्हणाल्या, ''फक्त रस्तेच नव्हे तर पाणीपुरवठा, स्वच्छता, गटारी, पथदिवे आणि इतर मूलभूत प्रश्न सोडवण्यासाठीही सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. विकासकामांमध्ये कोणताही भेदभाव न करता संपूर्ण प्रभागाचा सर्वांगीण विकास करण्याचे उद्दिष्ट ठेवून आम्ही काम करत आहोत. नागरिकांच्या सहकार्यामुळेच ही विकासाची गती कायम राहणार आहे.''



किशोर डागवाले यांनी आपल्या भाषणात प्रभागाच्या विकासासाठी सर्वांनी एकत्र येण्याची गरज व्यक्त केली. ते म्हणाले की, ''प्रभागाचा विकास करत असताना सर्व मतभेद दूर ठेवून खऱ्या अर्थाने विकास करण्याचा आमचा प्रयत्न असतो. निवडणुकीमध्ये आम्ही वेगवेगळ्या पक्षातून लढलो असलो तरी प्रभागाच्या विकासासाठी सर्वजण एकत्र येऊन काम करणे महत्त्वाचे आहे. नागरिकांच्या मूलभूत सुविधा आणि विकासकामांमध्ये राजकारण न आणता परिसराचा विकास व्हावा, हीच आमची भूमिका आहे.''

पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, ''या रस्त्याचे काम अतिशय दर्जेदार आणि टिकाऊ झाले पाहिजे यासाठी आम्ही संबंधित कॉन्ट्रॅक्टर तसेच महापालिकेच्या प्रशासनाला स्पष्ट सूचना दिल्या आहेत. नागरिकांना चांगल्या सुविधा मिळणे हा आमचा मुख्य उद्देश आहे. नगर शहराच्या विकासासाठी आमदार संग्राम जगताप तसेच पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विविध विकासकामांना गती मिळत असून आगामी काळातही अशाच पद्धतीने विकासाची कामे सुरू राहतील.''

यावेळी नगरसेविका आशा डागवाले, सुभाष लोंढे, गणेश कवडे, संतोष गेनप्पा, किशोर डागवाले, मनोज लोंढे, मुकुंद वाकळे, सुहास पाथरकर, संभाजी गिरे, रोहित हरबा, योगेश गणगले , अभय गुंदेचा, कासवा, दिलीप ओस्तवाल, रमेश गोडळकर, वसंत कुलकर्णी, अमोल गांधी, दीपक गणगले नंदू बेद्रे, नंदलाल भालेराव, संतोष गणगले , देवबा हरबा आदींसह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थित नागरिकांनी या विकासकामाबद्दल समाधान व्यक्त करत परिसरातील इतर प्रश्नांवरही सकारात्मक पद्धतीने काम सुरू असल्याचे सांगितले. रस्ता कॉंक्रिटीकरणामुळे वाहतुकीची समस्या कमी होऊन परिसर अधिक स्वच्छ आणि सुरक्षित होईल, असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला.

प्रभाग क्रमांक ११ मध्ये गेल्या काही काळात विविध विकासकामांना गती मिळत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. नागरिकांच्या मागण्यांचा विचार करून स्थानिक स्तरावर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

(पान १ वरून)

## तोफखाना हद्दीतील पाच जुगार अड्ड्यांवर छापे

व जुगाराचे साहित्य असा ९४ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

एकवीरा चौकात, हडको बिल्डिंगच्या आडोशाला जुगार खेळणारा श्रीनिवास गोविंद पारखे (रा. एकवीरा चौक, हडको) याच्याकडून ३ हजार ४५० रुपये रोख व जुगाराचे साहित्य जप्त करण्यात आले.

वाणीनगर कमानीजवळ, रामदास वाणी यांच्या कार्यालयाच्या मागे इमारतीच्या आडोशाला जुगार खेळणा-यांकडून ४ हजार ४०० रुपये रोख रक्कम, जुगाराचे साहित्य जप्त करण्यात आले. मोरया मंगल कार्यालयासमोर, वाणीनगर, पाईपलाईन रोड येथील पत्र्याच्या शेडमध्ये जुगार खेळणारे महेश रामदास लोखंडे (रा. वैदूवाडी), संकेत शहादेव बडे, (रा. वाणीनगर) यांच्याकडून २ हजार ६२० रुपये रोख रक्कम व जुगाराचे साहित्य असा ९ हजार ६२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या सर्व कारवायांमध्ये एकूण १ लाख १४ हजार ३७० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून आरोपींविरुद्ध तोफखाना पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार अधिनियम कलम १२ (अ) व इतर कलमांप्रमाणे स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

## केडगाव दुहेरी हत्याकांडानंतर झालेल्या दगडफेकीच्या गुन्ह्यातून सर्व निर्दोष

२३) प्रशांत बालू गायकवाड़ २४) मुकेश नंदकुमार जोशी २५) बालासाहेब बारस्कर २९९ २६) रंजीत थुबे २९९ २७) सचिन सुदाम थुबे २८) प्रफुल्ल देवीदास सालुंखे २९) गोविंद वर्मा २९९ ३०) चेतन मोहनलाल वर्मा ३१) विक्की विक्रांत अशोक भालेराव ३२) नयन चंद्रकांत गायकवाड़ ३३) सागर अंकुश दलवी २९९ ३४) सागर पंडित गायकवाड़ ३५) सागर विष्णु थोरात ३६) अभिषेक कैलाश भोसले ३७) रावसाहेब नारायण भाकरे रमेश ३८) दीपक सरजेराव कावले ३९) सचिन गणेश राउत ४०) दीपक ढेंड़ २९९ ४१) सुनील राउत २९९ ४२) रवि रविंद्र विलास वाकले ४३) मदन संपतराव आढव ४४) आदिनाथ राजू लक्ष्मण जाधव ४५) मनोज सत्यनारायण चव्हाण ४६) बंटी अनिल अशोक सतपुते ४७) अंगद देवीदास महानवर ४८) अशोक श्यामराव दहीफले ४९) कृषभ अंबड़ ५०) प्रतीक अर्जुन गर्जे ५१) सुशांत गिरिधर म्हस्के ५२) अनिल रामकिसन राठौड़ भैया ५३) ताजेस सतीश गुंडेचा ५४) बंटी कुणाल विष्णुपंत खैरे ५५) नरेंद्र बालू भालेराव नरेश गुड्डू ५६) लंकेश नागप्पा हरबा ५७) उमेश सदाशिव काले ५८) अक्षय मछिंद्र भांड ५९) दत्तात्रेय तुकाराम नागापुरे ६०) गिरीश राजेंद्र शर्मा ६१) नितिन अनिल चोभे ६२) शुभम चंद्रकांत परदेशी ६३) सुनील अर्जुन लालबोंद्रे ६४) दत्ता बाबासाहेब जाधव ६५) मुकेश सुधारकर गावड़े ६६) समीर सतपुते २९९. ६७) अमिल ज्ञानेश्वर शिवाजी येवले ६८) श्रीकांत संतोष धोंडीभाऊ फासले ६९) वैभव कोटकर ७०) विशाल पटारे ७१) सुनील गोपाल वर्मा ७२) गोरख दलवी

सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता मा.न्यायालयाने केली आहे या खटल्यात अ‍ॅड. महेश तवले,सतीश गिते,समीर पटेल,निलेश देशमुख,शशीकांत रकटे या सर्वानी युक्तिवाद केलय

## एक लाख वृक्ष लागवडीचे ध्येय; नगरकरांना वृक्षांचे महत्त्व पटवून देणार - उपमहापौर अ‍ॅड. जाधव

धनंजय गाडेकर, राहुल मुथा, शौर्य सुराणा, डॉ. अंशू मुळे, चंद्रकांत तागड, राजेंद्र देशमुख, राजेश गुगळे, संदीप पडवळ, एस. एस. क्षीरसागर, अंकुश काळे, किशोर कानडे, प्रताप वाखुरे आदींसह समितीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपमहापौर अ‍ॅड. धनंजय जाधव यांनी सांगितले की, ''आज ऋतुमानामध्ये मोठे बदल दिसत असून कधी अतिवृष्टी, कधी तीव्र उन्हाळा तर कधी थंडीचा अभाव असे चित्र निर्माण झाले आहे. हे पर्यावरण असंतुलन थांबवण्यासाठी वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनाची लोकचळवळ उभी राहणे अत्यंत गरजेचे आहे. शहरातील प्रत्येक नागरिकाने या मोहिमेत सहभागी होऊन वृक्षांचे महत्त्व समजून घेतले पाहिजे.

ते पुढे म्हणाले की, ''नामदार राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी मोहिमेमुळे अहिल्यानगरमध्ये हरित क्रांती घडवण्याचा प्रयत्न केला जात आहे. एक लाख वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट हे केवळ आकडेवारी नसून भविष्यातील निरोगी आणि स्वच्छ पर्यावरणासाठीचा ठोस संकल्प आहे. प्रत्येक कुटुंबाने किमान एक झाड लावून त्याचे संवर्धन करावे, हीच या मोहिमेची खरी दिशा आहे.

बैठकीदरम्यान सर्व सदस्यांनी वृक्षारोपण व संवर्धन ही काळाची गरज असल्याचे मत व्यक्त करत या उपक्रमाला व्यापक स्वरूप देण्याचा निर्धार केला. १ जूनपासून सुरू होणाऱ्या या मोहिमेत सर्व नगरकरांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

## श्रीरामपूरमध्ये अवैध वाळू वाहतूक करणारावर कारवाई

मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याबाबत श्रीरामपुर शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३(२), प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी व पथकातील उपनिरीक्षक संदीप मुरकुटे, अंमलदार पंकज व्यवहारे, भगवान थोरात, विशाल तनपुरे यांनी केली.

## जुगार-दारूविक्रेत्यांवर छाप्यात साडेअकरा लाखांचा मुद्देमाल जप्त

१० अवैध दारू विक्रेत्यांविरूध्द व एका अवैध जुगार खेळणा-याविरुध्द एकूण ११ गुन्हे दाखल करण्यात आले असून,७६ हजार ४७० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

कारवाई झालेली ठिकाणे
श्रीगोंदा, लोणी (राहाता),
राहुरी, बेलवंडी (श्रीगोंदा)
कोपरगाव तालुका, नेवासा (जुगार)